


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २९९, शनिवार १७ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# गीतांजली शेळके यांच्या पाठीशी उभे राहणे हे कर्तव्य!

■ खा. शरद पवार यांचे प्रतिपादन ■ शेळके फाउंडेशनचे बोधचिन्ह संकेतस्थळाचे अनावरण


मुंबई : रोहन उनवणे

**जी.एस. महानगर बँकेची सगळी जबाबदारी गीतांजली शेळके यांनी आपल्या खांद्यावर घेतली असून संस्थेच्या हितासाठी, सभासद, लोकांच्या भल्यासाठी त्यांच्या पाठीशी पुर्ण ताकदीने उभे राहणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य असल्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितले.**

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाणच्या वाय.बी. चव्हाण सभागृहात उदय गुलाबराव शेळके फाउंडेशनच्या बोधचिन्हाचे तसेच संकेतस्थळाचे अनावरण पवार यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मा. मंत्री बाळासाहेब थोरात, आनंदाराव अडसूळ, पद्मश्री पोपटराव पवार, विठ्ठलराव भोसले, अरूण कडू, सुधीर तांबे, अशोक धात्रक, बापूसाहेब पठारे, फाउंडेशनच्या अध्यक्षा गीतांजली शेळके, भास्करराव कवाद, सी. बा. अडसूळ यांच्यासह बँकेचे संचालक, विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना खा. पवार म्हणाले, गुलाबराव शेळके व उदय शेळके या दोघांनी आपल्या आयुष्यातला मोठा कालखंड समाजासाठी दिला. नगर जिल्ह्यातील दुष्काळी भागातील कष्टक-यांसाठी दिला. गुलाबराव शेळके अतिशय गरीब कुटूंबातलं, दुष्काळी भागातलं एक आगळं वेगळं व्यक्तीमत्व होतं. पोटाचा प्रश्न सोडवायचा असेल तर मुंबईला गेल्याशिवाय गत्यंतर नाही असा तो कालखंड होता. नगर जिल्हयात जिथे पाणी आहे तिथे कारखानदारी होता.

सहकार वाढलेला होता. काही भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा प्रश्न निर्माण व्हायचा त्यात पारनेर तालुक्याचा समावेश होता. त्यामुळे सन्मानाने जगण्यासाठी घाम गाळल्याशिवाय, कष्ट केल्याशिवाय गत्यंतर नाही ही स्थिती असायची. त्या काळात पारनेरची तरूण मंडळी मुंबईचा रस्ता धरीत असे. त्या कालखंडामध्ये गुलाबराव मुंबईत आले. दहा पंधारा रूपये मिळवायचे शिक्षण घेत जगायचे हे सुत्र त्यांनी त्यावेळी ठेवले होते. पदवीधर, सॉलीसीटर झाले असे पवार यांनी सांगितले. उत्तम घोलप यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले. उपाध्यक्ष भास्करराव कवाद यांनी आभार मानले.



■ उदय गुलाबराव शेळके फाउंडेशनचे बोधचिन्ह तसेच संकेतस्थळाचे खा. शरद पवार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

## सामाजिक परंपरा जतन करणार

स्व. गुलाबराव शेळके यांचे कर्तुत्व मोठे होते. उदयदादा शेळके यांनी त्यांना साथ देऊन महानगर बँकेचा वटवृक्ष वाढविला.सामाजिक, शैक्षणिक, सहकार क्षेत्रात काम करताना लोकभिमुख्य विकासासाठी त्यांनी योगदान दिले.मुली प्रियंका व आभा या शिक्षण क्षेत्रात हुशार असून स्व. गुलाबराव शेळके व स्व. उदयराव शेळके यांच्याकडून त्यांना हे बाळकडू मिळाले आहे. त्यांची हीच सामाजिक परंपरा जतन करण्यासाठी उदय गुलाबराव शेळके फाउंडेशनच्या माध्यमातून प्रयत्नशिल राहणार आहे.

**गीतांजली शेळके**
संचालक, जी एस महानगर बँक, जिल्हा बँक

## कर्तुत्वामुळे राज्य सहकारी बँकेचे चेअरमन

गुलाबरावांचे कर्तुत्व पाहिल्यानंतर त्यांना एका लहान बँकेपुरते मार्यादीत ठेवणे योग्य नाही हे लक्षात घेउन आशीया खंडातील सर्वात मोठया राज्य सहकारी बँकेची धुरा त्यांच्याकडे देण्याचा निर्णय आम्ही घेतला. एकमताने अध्यक्ष म्हणून निवड केल्यानंतर त्यांनी अतिशय उत्तम काम केले. या बँकेचे नेतृत्व वैकुंठभाई मेहता यांनी केले. भाऊसाहेब हिरे, वसंतदादा पाटील, भाऊसाहेब थोरात अशा कर्तुत्ववान व्यक्तींनी राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून सहकारात योगदान दिले त्यांच्या मालीकेत गुलाबराव जाऊन बसले ते कुणाच्या शिफारशीमुळे नाही तर त्यांच्या कर्तुत्वामुळे बसल्याचे पवार म्हणाले.

## नगरी आणि जुंद्री !

पारनेर व जुन्नर तालुक्याची स्थिती त्या काळात सारखीच होती. भायखळयाच्या मार्केटमध्ये जुन्नरचे लोक भेटायचे तर कुलाब्याच्या बंदरावर कष्ट करणारे पारनेर तालुक्यातील लोक भेटत. दोन्ही तालुक्यातील लोकांची आपली वेगळी ओळख असायची. पारनेरच्या लोकांना नगरी तर जुन्नरच्या लोकांना जुंद्री म्हणून ओळखले जायचे ही आठवणही पवार यांनी यावेळी सांगितली.

## झिरो एनपीए

सहकारी बँकांमध्ये महाराष्ट्राचा नंबर मोठा आहे. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक या राज्यांमध्ये देशातील निम्म्या नागरी बँका पहावयास मिळतात. तिथूनच सहकाराचा विस्तार झाला. हा विस्तार करताना आपण स्थापन केलेली संस्था व्यवस्थीत चालली पाहिजे हा दृष्टीकोण नेहमीच गुलाबरावांचा राहीला. या बँकेचा एनपीए झीरो आहे. कर्ज दिल्यानंतर ते थकू द्यायचे नाही हा स्वभाव संचालक व सहकाऱ्यांचा बनविणे ही साधी गोष्ट नाही. अनेक बँका संकटात सापडल्याच्या घटना घडल्या असल्याची पुस्तीही पवार यांनी यावेळी जोडली.

## ज्या रस्त्याने मराठी माणूस जात नाही तो रस्ता गुलाबराव यांनी धरला

आपल्या देशाच्या राजकारणात काही लोकांनी सॉलीसीटरचे शिक्षण घेतले. महात्मा गांधी, जवाहलाल नेहरूंचे त्यात नाव घ्यावे लागेल. त्यानंतर स्वातंत्र्याच्या संग्रामात, देशाच्या राजकारणात ते आले. अतिशय प्रतिकुल परिस्थितीमध्ये गुलाबराव सॉलीसीटर झाले आणि त्यांनी फर्म सुरू केली. फर्म सुरू करणे ही साधी गोष्ट नाही. या रस्त्याला मराठी माणूस फारसा कधी दिसत नसे. त्या रस्त्याला जाण्याचा निर्धार गुलाबराव यांनी केल्याचा गौरव पवार यांनी यावेळी बोलताना केला.

## गीतांजली यांच्या पाठीशी सदिच्छा, शुभेच्छा ठेऊ या

दुष्काळ आहे, संकटं आहेत. पण त्या दुष्काळावर, संकटावर मात करण्याची जिद्द असलेली माणसं नगरच्या दक्षिण भागात आपणास पहायला मिळतात. अशा कर्तुत्ववान जिल्हयातून गुलाबराव पुढे आले. त्यांचे काम उदय यांनी पुढे चालविले. आणि आज गीतांजली व त्यांचे सहकारी तेच काम पुढे नेत आहेत. आपल्या सदिच्छा आणि शुभेच्छा त्यांच्या पाठीशी कायम ठेऊ या.

**शरद पवार**, खासदार

## गुलाबरावांचे लक्ष पारनेरकडे

गुलाबराव सॉलीसीटर झाले मात्र त्यांचे लक्ष मात्र पारनेरकडे होते. तेथील लोकांचे जीवन बदलायचे असेल तर सहकाराशिवाय पर्याय नाही हे ओळखून त्यांनी महानगर बँकेचा जन्म घातला. गुलाबराव यांनी कष्टाने बँकींग क्षेत्राचे ज्ञान प्राप्त केल्याचे पवारांनी सांगितले.

## जिल्हा बँकेची काळजी वाटू लागलीय !

गुलाबरावांनी लावलेली शिस्त, त्यानंतर उदय शेळके यांनी हातात जबाबदारी घेतली आणि आता गितांजली शेळके आणि त्यांचे सहकारी या कामात मनापासून लक्ष देत आहेत. त्यामुळेच या बँकेचे वेगळे स्थान निर्माण झाले आहे. या बँकेप्रमाणेच नगर जिल्हा बँकेचेही उदय शेळके यांनी नेतृत्व केले. आज मात्र या बँकेची मला काळजी वाटू लागली आहे. आज त्या ठिकाणी कोण बसलं आहे आणि कसे लोक आहेत हे मला माहीती नाही. त्यावर भाष्य न करणे योग्य राहील असे सांगत पवार यांनी जिल्हा बँकेच्या कामकाजावर टिपन्नी केली.

## पारनेरकर आता पार्लमेंटमध्ये बोलायला लागले !

पारनेरकर तसे साधे लोक आहेत. पार्लमेंटमध्येसुध्दा आता पारनेरकर बोलायला लागले आहेत. निवडणूकीच्या काळात मी नगरला गेलो होतो त्यावेळी कोणीतरी चर्चा केली होती की हा पारनेरचा प्रतिनिधी दिल्लीत जाऊन कसा बोलणार ? निवडणूकीनंतर दिल्लीतील माझ्या निवासस्थानी पारनेरचे खासदार एका खोलीत माझ्या कार्यालयातील एक कर्मचारी दोघे बसले होते. या कर्मचाऱ्याला विचारले असता इंग्रजीतून शपथ घेण्याबाबत आमची चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पार्लमेंट सुरू झाले, कामकाज सुरू होऊन नाव पुकारल्यानंतर गडयाने इंग्रजीत शपथ घेतली. इंग्रजीतच शपथ घेतली पाहिजे असा नियम नाही तर तुमच्या राज्याच्या भाषेतून शपथ घेता येते, भाषण करता येते. त्यानंतर गाडी सुसाट सुटली. मराठीमध्ये या गडयाने जोरदार भाषणे ठोकल्याचे सांगत शरद पवार यांनी खा. नीलेश लंके यांच्या संसदेतील कामाचे कौतुक केले.

# शेतकऱ्यांचे आर्थिक हित पाहण्यासाठी कोणी पुढे येत नाही

■ भानुदास कोतकर यांची खंत ■ नेप्ती कांदा उपबाजारला कोतकर यांचे नाव



नगर : प्रतिनिधी

**नगर बाजार समितीचे संचालक होण्यासाठी मोठी लाईन लागते पण शेतकऱ्यांचे आर्थिक हित पाहण्यासाठी कोणी पुढे येत नाही.बाजार समितीच्या दुर्लक्षाने नगरचा कांदा विक्रीसाठी पुण्या -नाशिकच्या बाजार समितीत जातो.याचे कारण शोधा आणि गांभीर्याने घ्या.नगर बाजार समितीत ३ लाख कांदा गोणी विक्रीला आल्या पाहिजे यासाठी प्रयत्न करा असा सल्ला नगर बाजारचे माजी सभापती भानुदास कोतकर यांनी बाजार समिती पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना दिला.**

नगर बाजार समितीच्या नेप्ती उपबाजारचे आज भानुदास कोतकर उपबाजार समिती असे नामकरण करण्यात आले. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले , मा.खा .डॉ . सुजय विखे , मा .आ . अरूण जगताप , आ . संग्राम जगताप , मा .आ . अण्णासाहेब माने , मा .आ . नामदेव पवार , शिरूर बाजार समितीचे माजी सभापती मंगलदास बांदल , भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले ,भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग उपस्थित होते.

यावेळी कोतकर यांनी बाजार समिती पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना घरचा आहेर देत सांगितले की , मी सहकाऱ्यांना सोबत घेऊन फक्त ११ महिन्यात नेप्ती उपबाजार समिती उभी केली.हि बाजार समिती शेतकऱ्यांची आहे , त्यांच्याच हिताचे निर्णय येथे घेतले पाहिजे . मी पुण्याला असलो तरी सारे लक्ष नगर बाजार समितीवर असते. नगरचा कांदा अनेकदा पुण्या -नाशिकच्या बाजारात विक्रीला जातो . याचे कारण संचालकांनी शोधले पाहिजे.

यावेळी कर्डिले म्हणाले की , सरकारने कांदा निर्यातीचा निर्णय लवकर घ्यावा यासाठी मा.खा. विखे यांनी पुढाकार घ्यावा. लवकरच नेप्ती उपबाजारचा सात एकर जागेत विस्तार करण्यात येणार आहे.आ .संग्राम जगताप , अक्षय कर्डिले ,उदयनराजे कोतकर यांचेही यावेळी भाषण झाले.

स्वागत बाजार समितीचे उपसभापती रभाजी सूळ, प्रास्ताविक सभापती भाऊसाहेब बोठे यांनी तर आभार माजी सभापती हरिभाऊ कर्डिले यांनी मानले. यावेळी माजी सभापती अभिलाष घिगे, संतोष म्हस्के , सुवर्णा कोतकर , चंद्रकांत गाडे , सचिन कोतकर उपस्थित होते .

## तर माझा वांदा झाला नसता

मा.खा. सुजय विखे म्हणाले की , माझ्या हस्ते आज कांदा भाव फलकाचे अनावरण झाले. त्यात कांदा ३८ रू किलो दिसला .लोकसभा निवडणुकीच्या आधी असा भाव असता तर कांद्यामुळे माझा वांदा झाला नसता असे मिश्किलपणे सांगितले.

## आता उरलो कार्यक्रमापुरता

मा. खा . विखे म्हणाले की , मी कुठे गेलो नाही , कुठे जाणार नाही.मी येथेच राहणार.मला बोलवा किंवा नका बोलवु मी येणारच .मी फक्त आता कार्यक्रमच करणार आहे .

## तरच मला अभिमान वाटेल

बाजार समितीत शेतकऱ्यांना न्याय मिळायला हवा. हि त्यांच्यासाठी उभारली आहे . येथे येणारा शेतकरी समाधानी झाला तरच माझे नाव या उपबाजारला देण्याचा मला अभिमान वाटेल असा विश्वास भानुदास कोतकर यांनी व्यक्त केला.

# कल्याणकारी योजनांमधून जिल्ह्याच्या विकासाला गती

■ पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन
■ ७८ वा स्वातंत्र्य दिन समारोह,गुणवंतांचा सन्मान

नगर : प्रतिनिधी



**अनेक लोकोपयोगी निर्णयांतून सर्वसामान्यांना विकास साधण्याचे काम शासनामार्फत करण्यात येत आहे. विविध कल्याणकारी योजना गतीने व प्रभावीपणे राबवुन जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यात येत आहे.तिर्थक्षेत्र पर्यटन आणि औद्यगिक विकासातून रोजगार निर्मिती हाच प्राधान्यक्रम आहे. जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाच्या संकल्पात सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन राज्याचे महसुल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री श्री विखे पाटील यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी जनतेला उद्देशुन शुभेच्छा संदेश देताना ते बोलत होते.यावेळी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, स्वातंत्र्य दिनाचा आनंदोत्सव अधिक द्विगुणीत होण्यासाठी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावर्षीही 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्याचे उर्वरीत पान ३ वर









# चंदेरी

# प्रिया गिल अचानक कुठे गायब झाली?

**एकेकाळी बॉलिवूडची लोकप्रिय स्टार असलेली प्रिया गिल अचानक कलाक्षेत्रातून गायब झाली. एक काळ असा होता जेव्हा तिचे स्टारडम इतके होते की ते अगदी ऐश्वर्या रायलाही टक्कर देत होती. प्रिया गिल १९९९ मध्ये आलेल्या सिर्फ तुम चित्रपटात आरतीच्या भूमिकेतून रातोरात ती प्रसिद्धीझोतात आली. चित्रपटसृष्टीत ती मोठं स्थान मिळवेल असं वाटत असतानाच तिचं नशीब असं बदललं की हळूहळू ती या क्षेत्रातून गायब झाली.**



प्रिया गिल ही अतिशय सुंदर अभिनेत्री होती. १९९५ मध्ये तिने ऐश्वर्यासोबत फेमिना मिस इंडियामध्ये भाग घेतला आणि फेमिना मिस इंटरनॅशनल बनली. यानंतर तिने मिस इंटरनॅशनलमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. सौंदर्य स्पर्धा जिंकल्यानंतर तिने फिल्मी दुनियेत करिअर घडवायला सुरुवात केली. प्रिया गिलने १९९६ मध्ये तेरे मेरे सपने या चित्रपटातून डेब्यू केला होता. या चित्रपटात तिचा नायक चंद्रचूड होता. यानंतर प्रिया गिलला सिर्फ तुम या रोमँटिक चित्रपटाची ऑफर आली. या चित्रपटात तिच्यासोबत संजय कपूर मुख्य भूमिकेत होता. सिर्फ तुममध्ये सुष्मिता सेन आणि सलमान खान यांच्याही महत्त्वाच्या भूमिका होत्या. डेब्यू चित्रपटानंतर जवळपास चार वर्षांनी १९९९ मध्ये सिर्फ तुम रिलीज झाला आणि त्याने इतकी कमाई केली की प्रिया गिल सिर्फ तुम गर्ल बनली.

## साधेपणा अन् निरागसपणा...

चित्रपटातील तिचा साधेपणा आणि निरागसपणा प्रेक्षकांना आवडला. एक साधी साडी आणि दोन वेण्या घातलेली तिने साकारलेली आरती भाव खाऊन गेली. प्रिया गिलने हिंदी चित्रपटांसोबतच पंजाबी, मल्याळम, तामिळ आणि तेलगू चित्रपटांमध्ये काम केले आहे. मात्र, आजही ती सिर्फ तुमसाठी ओळखली जाते. या सुपरहिट चित्रपटानंतर प्रिया गिलने अनेक चित्रपटांमध्ये काम केले. सिर्फ तुमनंतर प्रिया गिल इतकी लोकप्रिय झाली की, जोश चित्रपटात ऐश्वर्या रायऐवजी तिला शाहरुख खानची हिरोईन बनवण्यात आले. त्याचवेळी ऐश्वर्याला शाहरुखची बहीण व्हायचे होते आणि चंद्रचूड तिचा हिरो होता. प्रिया गिलची कारकीर्द जसजशी पुढे सरकत गेली तसतशी ती डगमगायला लागली. हिंदीनंतर या अभिनेत्रीने साऊथच्या चित्रपटांमध्येही नशीब आजमावले, पण तिचे चित्रपट फ्लॉप होत राहिले. त्यानंतर त्याला मुख्य भूमिकांऐवजी साईड रोल मिळू लागला. एक काळ असा होता की सुपरस्टार प्रिया गिलला पिया तोसे नैना लागे सारख्या भोजपुरी चित्रपटात काम करावे लागले होते. एकेकाळी शाहरुख खान आणि सलमान खानसोबत काम करणाऱ्या प्रिया गिलचे करिअर अंधारात गेले. २००६ मध्ये रिलीज झालेला भैरवी हा तिचा शेवटचा चित्रपट होता. यानंतर प्रिया गिलने चित्रपट जगताचा कायमचा निरोप घेतला.



### आता १८ वर्षांनंतर प्रिया गिल कुठे आहे?

चित्रपटांपासून दूर राहण्यासोबतच प्रिया गिल सोशल मीडियावरही सक्रिय नाही. ती त्या स्टार्सच्या यादीत सामील झाली आहे, ज्यांनी फिल्मी दुनियेतील ग्लॅमर पाहून अंधार पाहिला. प्रिया गिलबद्दल असे म्हटले जाते की ती शोबिजपासून दूर डेन्मार्कमध्ये स्थायिक झाली आहे आणि तिचे वैवाहिक जीवन एन्जॉय करत आहे.

# पडद्याच्या सिनेमाचं महत्त्व कमी होणार नाही

## सुप्रसिद्ध अभिनेत्री शेफाली शाहचे मत




**सुप्रसिद्ध अभिनेत्री शेफाली शाहचे प्रोफेशनल लाईफसोबतच पर्सनल लाईफही चर्चेत असते. शेफालीने अलीकडेच दिलेल्या विशेष मुलाखतीत वेगवेगळ्या विषयांवरील प्रश्नांवर उत्तरे दिली.**

- प्रश्न : टीव्ही, सिनेमा आणि आता तुम्ही OTT मध्ये काम करत आहात. बदलत्या माध्यमांसोबत अभिनेत्रीचे आयुष्य कसे बदलले आहे?
- शेफाली : पूर्वी सिनेमात फक्त एक नायक आणि एक नायिका यावर लक्ष केंद्रित केले जायचे. इतर सर्व कलाकारांकडे दुर्लक्ष व्हायचे. फार फार तर नायकाची आई, नायकाचा मित्र हेच लक्षात राहायचे. परंतु ओटीटीच्या आगमनामुळे प्रत्येक कलाकाराला वेगळी ओळख मिळत आहे. त्याच्या कामाचे कौतुक होत आहे. यामुळेच माझ्यासारख्या अभिनेत्रीलाही काम मिळते. हे सर्व कलाकारांसाठी महत्त्वाचे आहे. कारण आमचे काम आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही पाहिले जाऊ शकते.
- प्रश्न : महिला कलाकारांमध्ये काय बदल झाला आहे?
- शेफाली : आज स्त्रियांच्या दृष्टीकोनातून आणि स्त्रियांबद्दल अनेक कथा सांगितल्या जात आहेत. ज्याप्रमाणे समाजात आणि आपल्या सर्वांच्या जीवनात प्रगती होत आहे, त्याचप्रमाणे सिनेमा, टीव्ही आणि ओटीटीमध्येही विकास होत आहे. याआधीही आराधना, अभिमान किंवा आंधीसारखे अनेक चित्रपट स्त्रीकेंद्रित होते. मग एक काळ असा आला की नायिका या नायकाच्या केवळ ॲक्सेसरीज बनल्या. आता ते युग पुन्हा सुरू होत आहे, जिथे नायक-नायिकेला समान महत्त्व असते. कधीकधी ती नायकापेक्षाही महत्त्वाच्या भूमिकेत असते.
- प्रश्न : आज अशी वेळ आली आहे का जेव्हा एखादी अभिनेत्री स्वतः म्हणू शकते की ती हा प्रोजेक्ट करणार आहे की नाही?
- शेफाली : मला जे करायचे होते ते मी नेहमीच केले आहे. ही वैयक्तिक बाब आहे. मी नेहमीच निवड केली आहे. असे काही चित्रपट होते ज्यात मी असते तर मी जास्त प्रसिद्ध झाले असते. पण तो विषय माझ्या मनाला भिडला नाही म्हणून मी ते केले नाहीत. त्यामुळे ही निवड नेहमीच माझी असते आणि आज आपण त्या युगात आहोत जेव्हा आपण हे करू शकतो.



- प्रश्न : आजकाल सिनेमाला प्रेक्षक मिळत नाहीयेत. हा ओटीटीचा परिणाम असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तुम्हाला यविषयी काय वाटते?
- शेफाली : त्याचा परिणाम होईल. कारण जेव्हा चित्रपट सिनेमागृहात प्रदर्शित होईल, तेव्हा काही लोकांना वाटते की ते काही आठवड्यांनंतर OTT वर पाहतील. पण आपल्या देशात चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहणे ही संस्कृती आहे. संपूर्ण कुटुंबासोबत जा, समोसे खा, एकत्र हसून चित्रपटाचा आनंद घ्या, त्यामुळे हे बदलणार नाही. पण हो, OTT चा नक्कीच परिणाम होईल. असे अनेक चित्रपट आहेत जे पाहिल्यानंतर प्रेक्षक म्हणतात की हा चित्रपट मी मोठ्या पडद्यावरच पाहणार आहे. त्यामुळे हे बदलणार नाही.
- प्रश्न : तुमची मुलं तुम्हाला कधी सल्ला देतात का, की आई, तू अशी एखादी व्यक्तिरेखा किंवा कथा कर...
- शेफाली : पूर्वी मुलांना सगळ्या गोष्टी शिकवाव्या लागायच्या. आता उलटे झाले आहे. आता मुलांना हवं तसं आपल्याला वागावं लागतं. किंबहुना आपणही मुलांसोबत वाढतो. अनेक गोष्टींवर आपली वेगवेगळी मते असू शकतात पण मुलभूत मूल्ये आहेत, ती योग्य ठिकाणी आहेत. अशा बऱ्याच गोष्टी आहेत जिथे मुले म्हणतात की तू हे करू नको, हे बदल कर...
- प्रश्न : तुम्ही दिल्लीत आलात तर दिल्लीच्या कोणत्या आठवणी तुमच्याशी निगडीत आहेत? आणि दिल्ली तुम्हाला प्रेरणा देते का?
- शेफाली : दिल्लीशी संबंधित माझ्या दोन महत्त्वाच्या आठवणी आहेत. एक माझा राष्ट्रीय पुरस्कार, दुसरा दिल्ली क्राईमच्या शूटिंगचा. तो माझ्या आवडत्या शोपैकी एक आहे. तो संपूर्ण शो आम्ही दिल्लीत शूट केला. माझा एक जवळचा मित्रही दिल्लीचा आहे. मला दिल्लीत येऊन खूप मजा येते. मला फक्त दिल्लीच प्रेरणा देते असे म्हणणे योग्य ठरणार नाही. मला वाटते की इथले लोक ठिकाणांपेक्षा जास्त प्रेरणा देतात.

# पती निखिल पटेलवर दलजीत कौरचे गंभीर आरोप



**टीव्ही अभिनेत्री दलजीत कौरचे दुसरे लग्नही मोडण्याच्या मार्गावर आहे. २०१५ मध्ये शालीन भानोतपासून लग्नाच्या ८ वर्षांनी घटस्फोट घेतल्यानंतर दलजीतने २०२३ मध्ये दुसरे लग्न बिझनेसमन निखिल पटेलसोबत केले. मात्र आता तिने निखिलवर विवाहबाह्य संबंधाचे गंभीर आरोप केले आहेत. दलजीत आणि निखिलच्या वैवाहिक जीवनात सर्व काही ठीक नसल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. त्याला आता अधिकृ दुजोरा मिळाला आहे. दलजीतने इन्स्टाग्रामवरून लग्नाचे फोटो हटवले आहेत. आता निखिल पटेलवर आरोप केले आहेत.**

निखिल पटेलसोबत वाद सुरू असल्याच्या अफवांवर आजवर दलजीतने चुप्पी साधली होती. पण आता इन्स्टाग्रामवर सूचक पोस्ट शेअर करून 'या प्रेमाला काय नाव देऊ?' असे तिने म्हटले आहे. नात्यातील कटुता या पोस्टमध्ये स्पष्टपणे दिसून येते. एवढेच नाही तर निखिल पटेलने बेवफाई केली आहे का, त्याचे एक्स्ट्रा मॅरिटल अफेअर आहे का, अशी चर्चा सुरू झाली आहे. दलजीत कौरने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक पोल सुरू केला आहे आणि चाहत्यांना एक पर्याय देताना विचारले आहे की, अतिरिक्त वैवाहिक संबंधांबद्दल तुमचे मत काय आहे? यासाठी कोणाला दोष द्यायचा? मुलगी, पती किंवा पत्नी असे तीन पर्याय आहेत.

दलजीतने आणखी एक इन्स्टा स्टोरी शेअर केली आहे, जी थेट पती निखिलबद्दल आहे. या पोस्टमध्ये निखिल हा एसएन नावाच्या मुलीसाठी कमेंट करत आहे की, तुम्ही मला चांगले बनवले आहे. निखिलच्या या कमेंटवर प्रकाश टाकत दलजीतने लिहिले की, तुम्ही आता सोशल मीडियावर तिच्यासोबत रोज निर्लज्जपणे समोर येता. तुमची संपूर्ण कुटुंबाला लाज वाटू लागली आहे. दलजीतने तिच्या पतीचे पटेल आडनावही तिच्या नावासमोरून काढून टाकले आहे.

### लग्नानंतर काही महिन्यांनी वाद...

लग्नाच्या काही महिन्यांनंतरच दलजीत आणि निखिलच्या वैवाहिक जीवनात अडचणी वाढल्याचा दावा करण्यात आला होता. आपण एकमेकांसाठी योग्य नसल्याची जाणीव दोघांनाही होऊ लागली. मात्र गेल्या काही महिन्यांपासून परिस्थिती बिकट झाली आहे. दलजीत आणि निखिल यांचे १० मार्च २०२३ रोजी लग्न झाले. कुटुंबातील सदस्य आणि जवळच्या मित्रांच्या उपस्थितीत हे लग्न झाले. यापूर्वी दलजीतने २००९ मध्ये अभिनेता शालीन भानोतशी लग्न केले होते. मात्र सहा वर्षांनंतर दोघांचा घटस्फोट झाला. त्यानंतर दलजीतने शालीनवर घरगुती हिंसाचाराचे गंभीर आरोप केले होते.

# बॉर्डर २ येणार, प्रदर्शनाची तारीखही ठरली!

सनी देओलच्या 'गदर २' या चित्रपटाने मागच्या वर्षी चित्रपटगृहांमध्ये धुमाकूळ घातला होता. आता सनी देओलच्या आणखी एका जुन्या चित्रपटाचा सिक्वेल प्रेक्षकांना मोठ्या पडद्यावर पाहता येणार आहे. १९९७ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बॉर्डर' या मल्टीस्टारर चित्रपटाचा सिक्वेल कधी येणार याबद्दल चाहत्यांच्या मनात उत्सुकता होती. २०२६ मध्ये हा चित्रपट देशभरात प्रदर्शित होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

मुख्य म्हणजे या वेळी सनी देओलसोबत आयुष्मान खुरानादेखील महत्त्वाच्या भूमिकेत असणार आहे. हा चित्रपट २३ जानेवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. चित्रपटाशी संबंधित एका सूत्राने सांगितलं की भारतीय सशस्त्र दलाच्या शौर्याचा गौरव करणारा हा चित्रपट आहे. त्यामुळे या चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी प्रजासत्ताक दिनापेक्षा चांगली वेळ असू शकत नाही असं निर्मात्यांना वाटतं आहे. त्यानुसार त्यांनी २६ जानेवारीपूर्वी २३ जानेवारीला हा चित्रपट प्रदर्शित करायचा असं ठरवलं आहे. या चित्रपटाच्या कथेवर जवळपास वर्षभरापासून काम सुरू आहे, असं म्हटलं जात आहे. 'बॉर्डर पार्ट १' सारखा ब्लॉकबस्टर चित्रपट व्हावा, या दृष्टीकोनातून चित्रपटाची स्क्रिप्ट लिहिली जात आहे. मागच्या महिन्यात या चित्रपटाच्या कथेसंदर्भात माहिती समोर आली होती. यावेळी १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यादरम्यान झालेल्या युद्धाची कथा दाखवण्यात येणार आहे. राजस्थानमधील थारच्या लोंगेवाला भारतीय चौकीवर ही लढाई झाली होती. हा आजवरचा सर्वात मोठा युद्धपट ठरणार असल्याचंही म्हटलं जात आहे. या चित्रपटाची कथा पहिल्या भागापेक्षा पूर्णपणे वेगळी असणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुराग सिंह करत आहेत.



## भूल भुलैया ३ विरुद्ध सिंघम अगेन

# दिवाळीला होणार घमासान

# अजय देवगण की कार्तिक आर्यन कोण ठरणार वरचढ?

**यंदा ईदच्या दिवशी बॉक्स ऑफिसवर मोठा संघर्ष पाहायला मिळाला. अक्षय कुमारचा बडे मियाँ छोटे मियाँ आणि अजय देवगणचा मैदान एकमेकांशी भिडला होता. या स्पर्धेत दोन्ही चित्रपटांना पराभवाचा सामना करावा लागला. आता ईदनंतर दिवाळीच्या दिवशी आणखी एका मोठ्या बॉक्स ऑफिस क्लॅशबाबत अपडेट आले आहे.**




कार्तिक आर्यनचा चंदू चॅम्पियन हा चित्रपट चर्चेत आहे. हा चित्रपट काही दिवसांत प्रदर्शित होणार आहे. अशा परिस्थितीत अभिनेता प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान, त्याचा दुसरा मोठा चित्रपट भूल भुलैया ३ बाबत एक अपडेट आले आहे, जो चित्रपटाच्या रिलीज तारखेशी संबंधित आहे. प्रेक्षक भूल भुलैया ३ ची आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटाच्या शूटिंगला या वर्षी मार्चमध्ये सुरुवात झाली होती. भूल भुलैया ३ चे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी निर्माते मेहनत घेत आहेत. बॉलीवूड हंगामाच्या रिपोर्टनुसार, भूल भुलैया ३ यावर्षी दिवाळीला रिलीज होणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक अनीस बज्मी आणि निर्माता भूषण कुमार यांनी आश्वासन दिले आहे की ते दिवाळीला चित्रपट आणत आहेत. मात्र, रिलीजबाबत अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. कार्तिक आर्यनचा हा चित्रपट दिवाळीला रिलीज झाला तर बॉक्स ऑफिसवर मोठे घमासान युद्ध होणार आहे. कारण अजय देवगणचा सिंघम अगेन हा सिनेमाही दिवाळीला रिलीज होऊ शकतो. या चित्रपटाविषयी बातमी होती की हा स्वातंत्र्यदिनी प्रदर्शित होणार होता, परंतु पुष्पा द रुलसोबतचा संघर्ष वाचवण्यासाठी प्रदर्शनाची तारीख बदलण्यात आली. सिंघम अगेन संदर्भात बॉलीवूड हंगामामधील एका अहवालात असा दावा करण्यात आला आहे की रोहित शेट्टी आता आपला चित्रपट दिवाळीपर्यंत ढकलण्याच्या तयारीत आहे. मात्र, रिलीजची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. भूल भुलैया ३ आणि सिंघम अगेन हे दोन्ही चित्रपट दिवाळीला प्रदर्शित झाले तर मोठा संघर्ष होईल. कारण निर्माते दोन्ही चित्रपटांवर भरपूर पैसे गुंतवत आहेत. आता या स्पर्धेत अजय देवगण आणि कार्तिक आर्यन यांच्यातील कोणाचा चित्रपट बाजी मारणार आणि कोणता चित्रपट बॉक्स ऑफिसवर जिंकणार हे पाहणे रोमांचक ठरणार आहे.

# शॉर्ट न्यूज

## आपत्ती विषयक प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

■ **नेवासा :** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अहमदनगर यांच्या वतीने नेवासा येथील तहसील कार्यालयात आपत्ती विषयावर प्रशिक्षण व प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली होती. याप्रशिक्षण कार्यक्रमात नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्ती यांची माहिती देण्यात आली यामध्ये पुर, भुकंप, प्रथमोपचार चक्रिवादळ, रस्ता अपघात, दुष्काळ, गारपीठ, यामध्ये होणाऱ्या जिवीत हाणी व मालमत्तेचे नुकसान कसं होते याची माहिती देण्यात आली. भारत सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ साली लागु केला आहे.

## श्रीगोंदा तहसीलदार यांचे हस्ते फडकला तिरंगा

■ **श्रीगोंदा :** हर हर तिरंगा अभियान अंतर्गत किल्ले धर्मवीरगडावर (बहादूरगड) भारतीय स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संस्थेच्या वतीने भारताचा तिरंगा ध्वज फडकविण्यात आला. छत्रपती संभाजी महाराजांच्या अनन्वित अत्याचाराचा साक्षीदार असलेल्या या किल्ल्यावर ही ऐतिहासिक घटना ठरली आहे. तीन वर्षांपासून सातत्याने ही परंपरा कायम सुरू आहे. हर हर तिरंगा अभियान अंतर्गत किल्ले धर्मवीरगड पेडगाव येथे श्रीगोंदा तहसिलदार डॉ. क्षितिजा वाघमारे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## राहाता येथे दिव्यांग शिबिराचे आयोजन

■ **राहाता :** राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील मंत्री, महसूल, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य. यांच्या संकल्पनेतून महसूल पंधरवडा २०२४ ''एक हात मदतीचा - दिव्यांगांच्या कल्याणाचा'' या पंधरवडाचे औचित्य साधून तहसील कार्यालय राहाता येथे समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, अहमदनगर आणि स्पेशल ऑलम्पिकस भारत महाराष्ट्र अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत सहाय्यक साधनाचे वाटप करण्यात आले.

## जिल्हास्तरीय भक्तिगीत गायन स्पर्धा

■ **नगर :** शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराचे महंत परमपूज्य योगी गेंडानाथजी महाराज यांच्या २६ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्ताने शहरात स्वरबहार फाऊंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय खुल्या भक्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १६ वर्षांपासून पुढील स्पर्धक या स्पर्धेमध्ये भाग होवू शकणार आहेत. २७ ऑगस्ट रोजी गुलमोहर रोडवरील कोहिनूर मंगल कार्यालयात या स्पर्धा होणार असल्याचे फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेंद टाक यांनी कळविले आहे.

## श्रीरामपूर विधानसभेची जागा शिवसेनेला द्या

■ **श्रीरामपूर :** आगामी विधानसभा निवडणूकीत श्रीरामपूर विधानसभा मतदार संघातून उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला सेनेला उमेदवारी देण्यात आली तर विजय निश्चित आहे. त्यामुळे या मतदार संघातून शिवसेनेने उमेदवारी घ्यावी, अशी मागणी श्रीरामपूर तालुका प्रमुख लखन भगत यांनी शिवसेना नेते खा. अरविंद सावंत यांच्याकडे केली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना नेते खा. अरविंद सावंत शिर्डी येथे आले असता तालुकाप्रमुख भगत व इतर सेना कार्यकर्त्यांनी त्यांच्याकडे मागणी केली.

# हा पुरस्कार म्हणजे खरंतर ढोलकीचाच सन्मान !

**शिरुर : सतीश डोंगरे**



**तीन वर्षांपूर्वी हाताला अर्धांगवायू झाला अन् ढोलकीवरची थाप थांबली. घरात भिंतीवरील ढोलकीकडे नजर गेली की डोळ्यात आसवांची गर्दी व्हायची, आयुष्यभर कलेची सेवा केली पण डोक्यावर नीट छप्पर मिळाले नाही. माणसांच्या जगात कलेला काहीच किंमत नाही का ? असा विचार मनात यायचा पण आता आयुष्याच्या मावळतीला सरकारने दखल घेतली याचा निश्चित आनंद आहे. खरंतर मी हा ढोलकीचाच सन्मान समजतो, असे प्रसिध्द ढोलकीपट्टू जनार्दन वायदंडे यांनी सांगितले.**

राज्य शासनाच्या वतीने देण्यात येणारा तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावंकर जीवनगौरव हा १० लाख रुपयांचा पुरस्कार यंदा शिरुर तालुक्यातील कोंढापुरी येथील ढोलकीपट्टू जनार्दन वायदंडे यांना जाहिर झाला आहे. दहा लाखांच्या रोख रकमेसह मानचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. राज्य शासनाने तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावंकर जीवन गौरव पुरस्काराचे पुरस्कारार्थी निवडण्यासाठी निवड समिती गठित केली होती. या समितीने तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवन गौरव पुरस्कारासाठी श्री. वायदंडे यांच्या नावाची घोषणा केली.

गुरूवारी ( ता.१५ ) श्री.वायदंडे यांची त्यांच्या कोंढापुरी येथील घरी भेट घेतली. गावकुसाच्या बाहेर असणारी पत्र्याची खोली हे त्यांचं घर. घरात दाटीवाटीने मांडलेले घरातील साहित्य, मागच्या खोलीत भिंतीवर अडकवलेली ढोलकी अन् शेजारीच खुर्चीवर बसून श्री. वायदंडे आराम करीत होते. पुरस्कार जाहिर झाल्यापासून घरातील सर्व कुटुंबिय आनंदात होते. यावेळी श्री. वायदंडे यांनी तमाशाच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

सुमारे १९७० च्या दशकात तमाशा नावाची मोठी क्रेझ होती. बळीराजाच्या मनोरंजनाचा तो एक अविभाज्य घटक बनलेला होता. गावची जत्रा म्हणजे तमाशा असे समीकरण ठरलेले असायचे. अशाच तमाशाच्या माध्यमातून आपल्या ढोलकीने जनार्दन वायदंडे हे नाव महाराष्ट्रभर गाजत होते. जनार्दन वायदंडे यांचा वडिलोपार्जित व पारंपारिक व्यवसाय दोरखंड निर्माण करणे. घायपतापासून, शिंदीच्या झाडांपासून केरसुणी बनविणे, कावळीच्या वेलांपासुन डाली, पाट्या विणणे. सणसमारंभाचे निमित्ताने घराला आंब्याच्या पानांची तोरणे बांधणे आदी कामे करणारी बोटे ढोलकीशी मैत्री करुन गेली.

वडील आनंदराव यांच्या मार्गदर्शनाखाली ढोलकी वादनाचे धडे गिरवले पण शाळेचे धडे मात्र गिरवता आले नाही याची खंत मनोमन वाटते. काबाडकष्टाच्या जिवनामध्ये रोजची खायची भ्रांत असायची त्यामुळे शाळा शब्द फार लांबचा वाटायचा. त्यामुळे शाळेपेक्षा पारंपारिक व्यवसायातून जगण्याची धडपड जास्त असायची. परंतु त्यातुनही ढोलकीचा नाद काही स्वस्थ बसू देत नव्हता. तमाशाच्या फडात दाखल झाल्यावर सुरुवातीला सर्वच प्रकारची कामे करायला लागत असत, असे श्री. वायदंडे यांनी सांगितले.

तुकाराम खेडकर सह कांताबाई सातारकर, पांडुरंग मुळे मांजरवाडीकर या तमाशांमधून वायदंडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. परंतु दत्ता महाडिक पुणेकर सह चंद्रकांत ढवळपुरीकर या तमाशाच्या फडात प्रदिर्घ काळ काम केले आणि इथेच खऱ्या अर्थाने जनार्दन वायदंडे यांच्या ढोलकी ला महाराष्ट्राने डोक्यावर घेतले. जनार्दन वायदंडे यांच्यावर दत्ता महाडिक यांचे विशेष प्रेम. सन १९७० ते ८० च्या दशकात हा तमाशा फड महाराष्ट्रात सर्वोच्च स्थानावर होता. कोंढापुरीमध्ये जनार्दन सुट्टीवर आले तर त्यांना घ्यायला स्वतःची गाडी दत्ता महाडिक पाठवायचे, इतका जिव्हाळा, प्रेम आणि अतुट नातं दोघांमध्ये होत. तमाशाचे बॅनर, त्यावर महाडिकांचा फोटो, नवी कोरी जीपगाडी गावात यायची ती खास जनार्दन वायदंडेसाठी. अशा अनेक आठवणींना ग्रामस्थांनी उजाळा दिला.

**शिरूर तालुक्याचा तिसऱ्यांदा सन्मान !**

महाराष्ट्र सरकारने २००६ मध्ये तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार सुरू केला आहे. तमाशा क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार बहाल केला जातो. सन २०१६ मध्ये गंगारामबुवा कवठेकर यांना तर २०१९ मध्ये बी. के. मोमीन कवठेकर यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. यंदा ढोलकीपट्टू जनार्दन वायदंडे यांच्या रुपाने तिसऱ्यांदा शिरुर तालुक्याला हा मान मिळाला आहे. विशेष म्हणजे यंदा प्रथमच शासनाने पुरस्काराची रक्कम ५ लाख रुपयांवरुन १० लाख रुपये केली आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

### चिकू

मला अर्धांगवायूचा विकार आहे. रोज गोळ्या घ्याव्या लागतात.याशिवाय दररोज सकाळ-संध्याकाळ एकेक तास चालण्याचा व्यायामही करावा लागतो. म्हणून गावातून मळ्यात जाणाऱ्या डांबरी सडकेने दररोज चालण्याचा व्यायाम करतो. त्या सडकेच्या काठी दोन घरे आहेत. तिथली बालके आणि किशोरवयीन मुले कधी अंगणात तर कधी सडकेवर खेळ खेळत असतात. कारण या सडकेवर वाहतूक आणि रहदारी तुरळकच असते.



एक दिवस त्या सडकेच्या काठाकाठाने त्या वस्तीवरील एक किशोरवयीन मुलगी कुत्र्याचे पिल्लू खेळवीत होती. त्याच्या गळ्याला पट्टा असून दोरीही बांधलेली होती. मी चालता चालता त्या मुलीला विचारले, या पिल्लाचं नाव ठेवलं आहे की नाही? ती मुलगी नाही म्हणाली. त्यावर मी म्हटले, या पिल्लाला चिकू, टिकू असं एखादं नाव द्यायचं. म्हणजे त्यालाही बरं वाटतं. आपण हाक मारताच ते आपल्याकडं धाव घेतं. त्याचं नाव घेऊन जा म्हणताच ते दूर जातं. आपल्यात आणि त्याच्यात जवळीक निर्माण होते. आपुलकीचं नातं तयार होतं.

दुसऱ्या दिवशी मी त्या सडकेने जात असताना मुले चिकू चिकू म्हणून त्याच्याशी खेळत होती. पिल्लाच्या गळ्याला दोरीही बांधलेली नव्हती! मुले आणि कुत्र्याचे पिल्लू त्या दिवशी रोजच्यापेक्षा खूपच आनंदी दिसली!

कुणाला ही गोष्ट फालतू वाटेल. पण बारीक विचार केला तर यात तथ्य आहे हे आढळून येईल!

इस जाम को भी तोड़ दूं पर ये ख़याल है।
शीशे की पालकी में कोई ख़ुशजमाल है।।

सलाम मछलीशहरी म्हणतात, हा (दारूचा) पेला फोडून टाकावा वाटले. पण (लगेच) लक्षात आले की, काचेच्या पालखीत काही तरी सुंदर आहे!

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# अकारी पडीत जमीनी शेतकऱ्यांना पुन्हा मिळणार - महसूलमंत्री राधाकृष्ण विखे

**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**तालुक्यातील अकारी पडीत जमीनी शेतकऱ्यांना पुन्हा देण्याबाबतचा महत्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने दिल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासाठी अनेक वर्षे कराव्या लागलेल्या शेतकऱ्यांच्या संघर्षाला यश मिळाले असून, महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या बाजुने घेतलेल्या भूमिकेवर न्यायालयानेही शिक्कामोर्तब केली असल्याची प्रतिक्रिया महसूल तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.**



अकारी पडीत जमीनींच्या संदर्भात प्रशासकीय आणि न्यायालय स्तरावर अनेक वर्षे प्रश्न प्रलंबित होता. तालुक्यातील सुमारे साडेसात हजार एकर जमीनींच्या संदर्भात असलेल्या प्रश्नाच्या बाबत शेतकऱ्यांना अनेक वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागला. राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर खंडकरी शेतकऱ्यांप्रमाणेच अकारी पडीत जमीनींच्या संदर्भात सुध्दा तातडीने निर्णय होण्याकरीता महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी मंत्रालयात सातत्याने बैठका घेवून शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय होईल अशी भूमिका घेतली होती. संभाजीनगर उच्च न्यायालयात याबाबत दाखल झालेल्या याचिकेमध्ये सुध्दा सरकारने प्रभावी बाजू मांडून शेतकऱ्यांना न्याय कसा मिळेल अशी भूमिका घेतली.

न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे स्वागत करुन, मंत्री विखे पाटील म्हणाले की, शंभर वर्षांहून अधिक काळ चाललेल्या या शेतकऱ्यांच्या संघर्षाला खऱ्या अर्थाने मोठे यश मिळाले आहे. यामध्ये महायुती सरकारची भूमिका ही महत्वपूर्ण ठरली. यापुर्वी लोकनेते स्व.बाळासाहेब विखे पाटील यांनी अकारी पडीत जमीन मालकांच्या हक्कासाठी प्रयत्न केले होते. मात्र त्या त्या वेळच्या सरकारला शेतकऱ्यांची संवेदनशिलता समजली नाही. यापुर्वीही जिल्ह्याला महसूल मंत्रीपद होते त्यांनी तर, शेतकऱ्यांना जमीनी देता येणार नाहीत हीच भूमिका घेतली होती मात्र दुसरीकडे त्या जमीनी कराराने देण्याच्या हालचाली सुरु केल्या होत्या मात्र राज्यात महायुतीचे सरकार असल्यानंतर महामंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत तसेच वकीलां समवेत बैठका घेवून या जमीनी पुन्हा शेतकऱ्यांना पुन्हा कराव्या लागतील अशीच बाजू आपण सातत्याने घेतली. याकडे ना.विखे पाटील यांनी लक्ष वेधले.

# वंचितच्या पदाधिकाऱ्यांचे राजीनामे आरपीआय आंबेडकर गटात केला प्रवेश

**नगर : प्रतिनिधी**




**वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष नीलेश गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राजीनामा देऊन दीपक निकाळजे यांच्या उपस्थितीत आरपीआय आंबेडकर गटात प्रवेश केला. नगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी नीलेश गायकवाड व महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख संतोष गलांडे यांना नियुक्तीपत्रे देण्यात आले.**

यावेळी सचिन घोडके, आबासाहेब रामफळे, अशोक मोरे, नाना सांगळे, आरपीआय आंबेडकर गटाचे युवक शहर अध्यक्ष संदीप वाघमारे, उत्तर जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे आदी उपस्थित होते. पत्रकार परिषदेत नीलेश गायकवाड म्हणाले, की वंचित बहुजन युवा आघाडीचा राजीनामा देण्यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे पक्षातील राज्य उपाध्यक्ष किसन चव्हाण व अरूण जाधव हे कार्यकर्त्यांवर अन्याय करीत आहेत. त्यामुळे पक्षाची वाढ होत नाही. बाळासाहेब आंबेडकर यांना चुकीची माहिती देऊन कायम गैरसमज निर्माण करीत आहेत.

काही दिवसांपूर्वी ओबीसी आरक्षणासाठी राज्यात यात्रा काढण्यात आली होती. ही यात्रा जामखेड तालुक्यातील चौंडी येथे आली, त्यावेळी कर्जत तालुक्यातील सर्व पदाधिकारी उपस्थित असूनही जाधव यांनी पदाधिकाऱ्यांचे नाव घेणे मुद्दाम टाळले. कार्यकर्त्यांचा अपमानाला कंटाळून राजीनामा दिला. लोकसभा निवडणुकीत किसन चव्हाण व अरूण जाधव यांनी पक्षाची दिशाभूल केल्याचा आरोप त्यांनी केला.

(पान १ वरून)

## कल्याणकारी योजनांमधून जिल्ह्याच्या विकासाला गती

देशवासियांना आवाहन केले होते. जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर राष्ट्रध्वज फडकवून देशाप्रती व्यक्त केलेला अभिमान आणि भारत मातेच्या प्रती दाखवलेली कृतज्ञता ही अखंड व बलशाली भारताच्या एकजुटीचे प्रतिक ठरले आहे. या उपक्रमाने प्रत्येक शहर, गाव, वाडी-वस्ती तिरंगामय झाल्याचा मनस्वी आनंद होत आहे. स्वातंत्र्यानंतर या देशाच्या प्रगतीची वाटचाल अनेक टप्पे पुर्ण करुन यशस्वी होतांना दिसत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत देशाचे नाव पुर्ण विश्वामध्ये घेतले जात असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी पालकमंत्री श्री विखे पाटील यांनी उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, पदाधिकारी, अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छाही दिल्या.यावेळी उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, सहायक पोलीस निरीक्षक प्रकाश पाटील, पोलीस उपनिरीक्षक पल्लवी वाघ, समाधान फडोळ, मनोज अहिरे, मनोहर खिदळकर, विलास जाधव यांचा सन्मान करण्यात आला. युद्धात अपंगत्व आलेल्या सैनिकांना ताम्रपटाचेही वितरण यावेळी करण्यात आले. यामध्ये नायब सुभेदार सुरेश आढाव, शिपाई बाळासाहेब डोंगरे, नायक किरण चौधरी, गनर कृष्णा हांडे यांचा समावेश होता.

प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, राहुरीचे तालुका कृषी अधिकारी बापूसाहेब शिंदे यांचाही पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विशेष उल्लेखनीय सेवा पुरस्काराकरिता निवड करण्यात आलेले सावरगावतळ ता. संगमनेर येथील पोलीस पाटील गोरक्ष नेहे यांचा तर आदर्श तलाठी म्हणून राहाता येथील तलाठी श्रीकृष्ण शिरोळे यांचाही पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

राज्य गुणवत्ता यादीत आलेल्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांमध्ये शौर्य हजारे, कृष्णा चन्ना,, श्रावण ढोरमले, तनिष्का चौरे व आयुष मोरे या विद्यार्थ्यांचाही पालकमंत्री श्री विखे पाटील यांनी गौरव केला.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नायब तहसिलदार संध्या दळवी यांनी केले.कार्यक्रमास पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, पत्रकार यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.






# हिवरेबाजारला सौर ग्रामचा जिल्ह्यात बहुमान

## महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांची माहिती

हिवरे बाजार : प्रतिनिधी

**नगर जिल्ह्यात प्रथमच सौर उर्जेचे गाव म्हणून हिवरे बाजारची निवड करण्यात आल्याची माहिती महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांनी दिली.**

सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांच्या हस्ते हिवरे बाजार ग्रामपंचायतीचे ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमास पवार हे उपस्थित होते. त्यावेळी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

यावेळी बोलताना प्रल्हाद गीते म्हणाले, पद्मश्री पोपटराव पवार यांनी गावासाठी अहोरात्र झटून आपले आयुष्य वेचले. गावाची ओळख जगभर नेली. गावामध्ये येताच माझ्या डोळयाचे पारणे फिटले. या गावचा इतिहास, विकास तसेच कोणतेही राजकारण न करता एकजुटीने गाव प्रगतीपथावर वाटचाल करत आहे.

यावेळी सादर करण्यात आलेल्या एनसीसीच्या पथकाचे संचलन, झांज पथक, समूहगीत पाहून शाळेची आठवण झाल्याचे गीते म्हणाले. एनसीसी पथक दर्जेदार आहे. शिस्त, ताल यामध्ये एकसारखेपणा दिसून येतो. आपणही प्रशिक्षण काळात नऊ महिने परेड केली असून आमच्यापेक्षाही एनसीसीचे छात्र चांगली परेड करतात असा गौरव करतानाच या छात्रांनी अशीच परेड करत दिल्लीची आरडी परेड करावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, दिलीप झांजे, रेणुका गीते, सरपंच विमल ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, रामभाउ चत्तर, व्हा चेअरमन हरिभाऊ ठाणगे, बाबासाहेब गुंजाळ, एस. टी.पादीर, रोहिदास पादीर, सहदेव पवार यांच्यासह ग्रामस्थ, यशवंत विद्यालय, जि. प. शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.



आदर्शगाव हिवरे बाजार येथे देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### हिवरे बाजारचे वैभव टिकून

आदर्श गाव हिवरे बाजार आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्या कामाविषयी अनेक दिवसांपासून ऐकूण होतो. आज प्रत्यक्षात डोळयांनी पाहिल्यानंतर भारावून गेलो. मोबाईल क्रांती आणि शहरीकरण झपाटयाने वाढल्याने गावे ओस पडू लागलेली असताना हिवरे बाजारचे वैभव टिकून असल्याचे रमेशकुमार पवार यांनी सांगितले.

### उत्पादनाची संधी निर्माण करू

जिल्ह्यात प्रथमच हिवरे बाजारची सौर उर्जेचे गाव म्हणून निवड करण्यात आली आहे. प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजना आपण सर्वजण एकत्र येऊन राबवू व भविष्यातील वीजेची गरज भागवून व वीज बील शुन्य करून वीजेची विक्री करत उत्पादनाची संधी निर्माण करू.

**रमेशकुमार पवार**
अधीक्षक अभियंता
महावितरण, नगर

# मंत्री विखे यांच्याकडून पारनेरच्या बैठकीचा आढावा

## सुनील थोरात यांनी सादर केला अहवाल

सुपा : प्रतिनिधी

**आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर बोलविण्यात आलेल्या महायुतीच्या घटक पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीचा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी सुपा येथे आढावा घेतला. लाडकी बहिण योजनेचे अध्यक्ष सुनील थोरात यांनी मंत्री विखे यांना बैठकीचा अहवाल सादर केला.**

या बैठकीस कोणते पदाधिकारी उपस्थित होते, कोण गैरहजर होते. कोणी काय भूमिका मांडली ? सर्वांनी एकत्रीतपणे निवडणूक लढविण्यावर काय मत व्यक्त केले ? याबाबत विखे यांनी सखोल माहीती घेतली. बंद दाराआड अर्धा तास विखे आणि थोरात यांच्यात खलबते झाली.

विविध शासकिय योजनांची तालुक्यात काय स्थिती आहे. महसूल प्रशासनाचे कामकाज कसे सुरू आहे याची माहीती घेतानाच राज्य व केंद्र शासनाच्या योजना समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविण्याचा सल्ला विखे यांनी यावेळी दिला. लोकसभा निवडणूकीतील पराभवाच्या पार्श्वभुमीवर मंत्री विखे यांनी पारनेरवर लक्ष केंद्रीत केले असून बारीक सारीक घटनांची त्यांच्याकडून दखल घेतली जात आहे. महायुतीच्या सर्व घटक पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकसंघ राहावे. उमेदवार जो कोणी निश्चित होईल त्याचे एकदिलाने काम करावे. लोकसभा निवडणूकीत पराभव झाला असला तरी मी तुम्हाला वाऱ्यावर सोडले नसून तुम्हाला पुर्ण पाठबळ दिले जाईल अशी ग्वाही मंत्री विखे यांनी यावेळी सुनील थोरात यांना दिली.



लाडकी बहिण योजनेचे अध्यक्ष सुनील थोरात यांच्या कार्यालयात मंत्री राधाकृष्ण विखे यांचे थोरात यांनी स्वागत केले.

### उमेदवारीची चाचपणी

बंद दाराआड झालेल्या बैठकीत आणखी काय चर्चा झाली याचा तपशील समजला नसला तरी कोणाला उमेदवारी दिली तर कसे राजकीय चित्र असेल याची चाचपणी विखे यांनी केल्याची माहीती आहे.

# साई सावली हॉस्पिटलमध्ये हृदयरोग निदान शिबिर

## स्वातंत्र्य दिनाचे औचित्य । डॉ. सायमन ग्रँड यांची उपस्थिती



टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून टाकळी ढोकेश्वर येथील साई सावली मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मोफत हृदयरोग निदान उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहीती डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी दिली.**

डॉ. खिलारी म्हणाले, या शिबिरामध्ये हृदयविकार असलेल्या रूग्णांची मोफत तपासणी करण्यात येऊन त्यापुढील उपचार पुण्याच्या प्रसिध्द रूबी हॉल क्लिनिक येथे अँजिओग्रामी, अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी असे महागडे उपचार मोफत करण्यात येणार आहेत.महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत न होणाऱ्या शस्त्रक्रिया देखील अतिशय अल्प दरामध्ये करण्यात येणार आहेत.

या उपलब्ध सुविधांचा लाभ परिसरातील सर्व गरजू रूग्णांनी घेण्याचे आवाहन साई सावली मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. भाऊसाहेब खिलारी, फिजिशियन डॉ. अश्विन खांडरे यांनी केले आहे. येत्या मंगळवारी दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून शिबिराचा लाभ घेण्यासाठी नाव नोंदणी करणे आवश्यक असल्याचे कळविण्यात आले आहे.

### डॉ. सायमन ग्रँड करणार तपासणी

विविध आजारांवरील उपचारासाठी प्रसिध्द असलेल्या पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक हृदयरोग तज्ञ डॉ. सायमन ग्रँड हे या हृदयरोग निदान व उपचार शिबिरात सहभागी होउन तपासणी करणार आहेत. शिबिरात अतिरक्तदाब, मधुमेह तसेच हृदयासंबंधीचे सर्व आजारांची तपासणी मोफत करण्यात येणार असून रूबी हॉस्पीटलच्या तज्ञ डॉक्टरांची टीमही या शिबिरास उपस्थित राहून तपासणी करणार आहे.

# स्थानिकांवरील अन्यायाविरोधात आंदोलनाचा इशारा

## औद्योगिक वसाहतीतील नामांकित कंपनी डावलत असल्याचा आरोप

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर-सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये पळवे खुर्दच्या हद्दीमधील महिंद्रा ऐसेलो प्रा. लि. या कंपनीच्या कामामध्ये भुमिपुत्रांना डावलले जात असून त्यांना कायमस्वरूपी प्राधान्य मिळावे या मागणीसाठी कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर धरणे आंदोलन तसेच आमरण उपोषणाचा इशारा पळवे येथील स्थानिक तरूणांनी जिल्हाधिकारी तसेच कंपनी व्यवस्थापनास निवेदनाद्वारे दिला आहे.**




स्थानिकांना प्राधान्य मिळावे अशी मागणी यापूर्वीच करण्यात आली होती, मात्र डावलले जात असल्याचे नमुद करून निवेदनात पुढे म्हटले आहे की, आमच्या घरापासून ४०० मिटर अंतरावर ही कंपनी आहे. असे असताना स्थानिकांना कोणतेही काम देण्यात आलेले नाही. शेतकऱ्यांच्या जमीनींचे भुसंपादन झालेले असताना, दुष्काळाचे सावट असल्याने स्थानिकांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. भुमीहिन झालेल्या तरूणांच्या हाताला काम हवे हीच तरूणांची माफक अपेक्षा असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

सन २०१८ मध्ये पळवे खुर्द येथे झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी, विभागिय आयुक्त, प्रांताधिकारी, तहसिलदार यांची बैठक होउन कंपन्यांच्या कामांमध्ये नियमाप्रमाणे स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल असे लेखी आश्वासन देण्यात आले होते. असे असतानाही खाजगी कंपन्यांकडून स्थानिक भुमिपुत्रांना, ग्रामस्थांना डावलण्याचे काम करण्यात येत आहे. स्थानिक भुमिपुत्र हे शेतकरी, कष्टकरी, गरीब कुटूंबातील असून या कुटूंबातील युवकांच्या हाताला काम मिळणे अपेक्षित आहे. रोजगार मिळावा या मागणीसाठी येत्या २५ ऑगस्ट रोजी धरणे आंदोलन करून आमरण उपोषणास प्रारंभ करण्यात येईल. कंपनी व्यवस्थापनाचे दखल न घेतल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# रूईछत्रपतीमध्ये आजी- माजी सैनिक संस्थेची स्थापना

## स्वातंत्र्यदिनी उद्घाटन सोहळा संपन्न

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील रुई छत्रपती येथील ६५ आजी माजी सैनिकांनी एकत्र येऊन देश सेवेनंतर समाजसेवेचे व्रत हाती घेऊन श्री छत्रपती आजी माजी सैनिक संस्थेची स्थापना केली. या संस्थेचा उद्घाटन सोहळा स्वातंत्र्यदिनी( गुरुवारी) उत्साहात पार पडला. सकाळी ग्रामपंचायत कार्यालय येथील मेरी मिट्टी मेरा देश प्रेरणा स्तंभावर पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले त्यानंतर कार्यालयात राष्ट्रध्वज फडकविण्यात आला.**

यावेळी श्री.ज्ञानेश्वर विद्यालय येथील सर्व विद्यार्थी, सर्व ग्रामस्थ, शेजारील गावातील संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्यांसह इतर मान्यवर उपस्थित होते. श्री ज्ञानेश्वर विद्यालय रुई छत्रपती येथील मागील वर्षी दहावी वर्गात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विद्यार्थ्यांना संस्थेचे सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी श्री लेफ्ट कर्नल साहेबराव शेळके (निवृत्त) ज्ञानदेव लंके गुरुजी यांच्या शुभहस्ते उद्घाटन सोहळा पार पडला तर श्री ऑनरली कॅप्टन तांबे (निवृत्त) हे अध्यक्ष म्हणून लाभले. या प्रसंगी रुई छत्रपती सरपंच डॉ. मच्छिंद्र दिवटे, माजी सरपंच बंडू साबळे, गोरक्ष दिवटे, मुख्याध्यापक प्रकाश तडके सर तसेच जातेगाव येथील मारुती पोटघन, नारायणगव्हाण येथील ज्ञानदेव शेळके, रायतळे येथील विजय येणारे, अस्तगाव येथील येणारे साहेब, बाबुर्डी येथील दिवटे साहेब उपस्थित राहिले. त्यांचा सन्मानचिन्हे देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी बऱ्याच सैनिक पत्नी, वीर माता, वीर पत्नी सह गावातील महिला उपस्थित होत्या त्यांचाही सन्मान करण्यात आला.



कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष शिवाजी साबळे, उपाध्यक्ष बाळू नाथा साबळे, सचिव चंद्रकांत बारवकर, खजिनदार नाना दिवटे सह सह संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली. याप्रसंगी गोरख बापू दिवटे यांची भारतीय सेना सेवानिवृत्ती बद्दल सहकुटुंब सन्मान करण्यात आला त्याच सोबत राजेंद्र साबळे यांची पोलीस दलात निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू मेहेत्रे यांनी केले. याप्रसंगी संस्थेमार्फत सर्व विद्यार्थी व ग्रामस्थांना स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

# स्वातंत्र्यदिन हा अखंड हिंदूराष्ट्राचा उत्सवच!

## सेवानिवृत्त सुभेदार राम डेरे यांचे प्रतिपादन




अळकुटी : प्रतिनिधी

**हिंदुस्थान विविधतेने नटलेला आहे. विविध धर्म, जाती, पंथ, भाषा, लिंग अशा घटकांनी समृद्ध झालेला आहे. जगाच्या पाठीवर असा अविष्कार फक्त भारत राष्ट्रातच पाहवयास मिळतो. या राष्ट्राच्या संरक्षणार्थ मिलिटरी दल सातत्याने तत्पर असते. याच मिलिटरी दलातून अनेक जवानांना ट्रेनिंग देऊन मी देशसेवेस हातभार लावू शकलो याचा अभिमान वाटतो. इंग्रजांच्या वसाहतवादातून भारतमाता मुक्त झाली म्हणूनच हा स्वातंत्र्यदिन अखंड हिंदूराष्ट्रात उत्सव म्हणूनच साजरा केला जातो असे प्रतिपादन सेवानिवृत्त सुभेदार राम डेरे यांनी केले.**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे ७८ वा स्वातंत्र्यदिन सुभेदार राम डेरे यांच्याहस्ते ध्वजारोहन करून करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी संस्थेचे सहसचिव भारत घोगरे पाटील अध्यक्षस्थानी उपस्थित होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास सांगत आजच्या आधुनिक भारताची उत्तरोत्तर होणारी प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले व सरकारच्या विविध योजनांचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.संस्थेचे विश्वस्त भाऊसाहेब जऱ्हाड पाटील यांनी स्वातंत्र्यादिनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी सरपंच भाऊसाहेब डेरे, सरपंच बाळासाहेब आवारी, पारनेर खरेदी-विक्री संघांचे संचालक संग्राम पावडे, भाजपा जिल्हा कार्यकारिणीचे किसन शिंदे, अतुल माने, उपपप्राचार्य प्रा. अर्जुन चाटे, प्रा. विशाल रोकडे तसेच सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचलन प्रा.राजाराम गोर्डे यांनी केले. तर प्रास्ताविक प्रा. विनायक सोनवणे व प्रा.अर्जुन चाटे यांनी आभार मानले.

# पारनेर पब्लिकच्या विद्यार्थ्यांचा कृतीतून स्वच्छतेचा संदेश

## तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन, बाजारतळाची स्वच्छता

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेरचे तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन तसेच बाजार तळाची स्वच्छता करीत पारनेर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी कृतीतून स्वच्छतेचा संदेश दिला.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धात्मक उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात पारनेर पब्लिक स्कुलच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून बुधवारी इयत्ता सातवी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी पारनेर नगरपंचायत हद्दीतील विविध सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविल्याचे प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी सांगितले. निरोगी आरोग्यासाठी आवश्यक स्वच्छतेचा वसा जतन करण्याचा संदेश विद्यार्थ्यांनी या मोहिमेद्वारे दिला.

### प्रेरणादायी अभियान

पारनेर पब्लिक स्कुलने हाती घेतलेले स्वच्छता अभियान कौतुकास्पद असून इतरांसाठी प्रेरणादायी आहे. चांगल्या आरोग्यासाठी परिसराची स्वच्छता खुप महत्वाची आहे. म्हणूनच आपण परिसर स्वच्छतेला महत्व दिले पाहिजे.

**गायत्री सौंदाणे**, तहसिलदार

### चांगले नेतृत्व करणारे अधिकारी व्हा

स्वच्छतेचा विचार जतन करत समाजाचे चांगले नेतृत्व करणारे कर्तव्यदक्ष अधिकारी व्हा. शिक्षणाबरोबरच आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे असून चांगल्या आरोग्यासाठी स्वच्छतेलाही तितकेच महत्व असल्याने पारनेर पब्लिक स्कुलने हाती घेतलेला हा उपक्रम स्तुत्य आहे.

**समीर बारवकर**, पोलीस निरीक्षक



स्वच्छता मोहिमेदरम्यान पोलीस निरीक्षक समीर बारवकर व त्यांचे सहकारी, पारनेर तहसिल कार्यालयात तहसिलदार गायत्री सौंदाणे , नायब तहसिलदार गणेश आढारी, पारनेर बाजारतळावर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई, माधव गाजरे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### स्वच्छतेचा वसा जतन

आपल्या जीवनात स्वच्छतेला महत्व असून परिसर स्वच्छ केला तर देश स्वच्छ होईल. म्हणून आपण आपल्या परिसर स्वच्छतेला महत्व द्यावे. परिसराची स्वच्छता करत असताना मुलांनी स्वच्छतेचा आनंद स्वच्छतेचा वसा जनत केला आहे.

**विनय शिपाई**
मुख्याधिकारी, नगरपंचायत, पारनेर

या अभियानात विद्यालयाचे प्राचार्य गिताराम म्हस्के, सचिन मोढवे, नलिनी गायकवाड, राहुल ठुबे, योगेश दुधाडे, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com